**नि.फौ.ख.क्र.२९१/२०१६**
**नि.१०१**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**
मी शपथेवर कथन करतो की,
माझे नाव: हनुमंत बापुराव भोंग,
माझे वय: ३२ वर्षे, माझा कामधंदा: शेती व नोकरी,
पत्ता : भोंगवस्ती, पोंदकुलवाडी बिजवडी, ता. इंदापूर.

**<u>सरतपास सरकारी वकिल श्रीमती जी. एस. अहिवले :—</u>**

दि.११/११/२०१५ रोजी घटना सायंकाळी ४:०० च्या सुमारास घडली. घटनेदिवशी मी माझी आई, पत्नी, वडिल बापुराव भोंग, भाउ नानासाहेब भोंग आम्ही व—हयांडयात गप्पा मारत बसलो असताना अचानक रोहिदास भोंगळे यांची तीन चाकी टमटम, विनोद विष्णू भोंगळे यांचा चार चाकी छोटा हत्ती, राघू नरसू भोंग यांची टि व्ही एस लुना, अमोल आत्माराम भोंग यांची टि.व्ही.एस. स्टार मोटार सायकल, आत्माराम भोंग यांची सी.डी १०० मोटार सायकल व सोनू उर्फ महेश हिरालाल भोंग यांची बॉक्सर मो.सा., रमेश काशिनाथ भोंग याची बजाज सी.टी.१०० मो.सा., बाळू भोंग यांची सी.बी.झेड, विष्णू, रोहिदास, जाईबाई, रोहिदास भोंगळे यांची पत्नी तसेच विनोद भोंगळे, राघू भोंग, सचिन भोंग, अमोल भोंग, आत्माराम भोंग, मंगल भोंग, शांताबाई भोंग, सागर भोंग, पिंटू ज्ञानदेव भोंग, पुष्पा पिंटू भोंग, रमेश काशिनाथ भोंग, ज्ञानदेव नरसू भोंग असे एकूण २० आरोपी त्यांच्या हातामध्ये काठी, लोखंडी गज, लोखंडी पाईप, कु—हाड, मिरची पावडर व दोन दगड त्याच्या हातात घेवून आमच्या घरी आले व त्यांनी मला व माझे भावास, आई, पत्नीस दमदाटी व शिवीगाळ केली. तसेच, मला आरोपींनी ज्या हत्यारांनी मारहाण केली ती दाखविल्यास मी ओळखू शकतो. सोनू भोंग यांनी माझे घरात येवून माझे डोक्यामध्ये कु—हाडीच्या उलट बाजूने मारले. सदरची कु—हाड दाखविल्यास मी ओळखू शकतो.

(सरकारी वकिलांनी सदरचा मुद्देमाल न्यायालयासमक्ष उघडून साक्षीदारास दाखविण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)

०२. आता मला कु—हाड दाखविण्यात आला. तो तीच आहे. त्यास **<u>अर्टिकल ए</u>** देण्यात आला. तसेच राघू नरसू भोंग यांनी मला काठीने मारहाण केली त्यामुळे माझा डावा हात फ्रॅक्चर झाला. सदरची

काठी मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदरची काठी मला दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>आर्टिकल बी</u>** देण्यात येतो. रमेश काशिनाथ भोंग यांनी मला लोखंडी गज व लोखंडी कु—हाडीने उजव्या पायाच्या गुडग्याच्या खाली नडगीवरती मारहाण केली. त्यामुळे माझा पाय फ्रॅक्चर झाला. सदरचा लोखंडी गज मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदरची लोखंडी गज मला दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>आर्टिकल सी</u>** देण्यात येतो. साक्षीदार स्वतहून सांगतो की मला रमेश याने लोंखडी कु—हाडीने मारहाण केली होती ती मुद्दमालमध्ये नाही. सचिन राघू भोंग यांनी मला, माझे आईला, भावाला व त्याच्या पत्नीच्या डोळयामध्ये मिरची पुड (चटणी) टाकली. तसेच मला, माझी पत्नी व आईस इतर आरोपींनी लाकडाने, काठीने व दगडाने व पोकळ पाईपने व लोखंडी मारहाण केली. सदरचा पोकळ पाईप मला दाखविल्याास मी ओळखू शकतो. सदरची पोकळ पाईप मला दाखविली. ती तीच आहे. त्यास **<u>आर्टिकल डी व दुस—या पोकळ पाईपस आर्टिकल डी—१</u>** देण्यात येतो. तसेच लोखंडी पोकळ पाईप यांना **<u>आर्टिकल डी—२ व डी—३</u>** असे देण्यात आले. मला माझे आई वडिलांना ज्या गजाने मारहाण केली होती त्यास गजास **<u>आर्टिकल सी—१</u>** देण्यात आला. शांताबाई भोंग व सागर भोंग यांनी मला, माझे आईस, भावास दगडाने मारहाण केली होती. सदरचा दगड मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. सदरचे दोन्ही दगड मला दाखविले. ते तेच आहेत. त्या दोन्ही दगडांना **<u>आर्टिकल ई व ई—१</u>** देण्यात येतो.

०३. आमच्यातील सदरचे भांडण सोडविण्यासाठी सुदाम तुळशीराम खामगर, सागर सुनिल गिरमे, अनिल नामदेव खामगर हे आले असता आरोपींनी त्यांना बाजूला जाण्यास सांगितले. सुदाम खामगर, सागर गिरमे अनिल खामगर यांनी मला, माझी आई व भावास पोलीस स्टेशनमध्ये आणले. आम्हाला इंदापूर येथिल सरकारी रूग्नालयात दाखल करण्यात आले. सरकारी रूग्नालयात आम्हाला माझा डावा हात व उजवा पाय मोडला असल्याने मगर हॉस्पीटल, इंदापूर येथे जाण्याचा सल्ला दिला. तेथे माझे पायाचे ऑपरेशन केले व पायात रॉड टाकला व हातास प्लास्टर केले. तेथे मी १५ ते १६ दिवस ॲडमिट होतो. पोलीसांनी मगर हॉस्पीटल, इंदापूर येथे माझा जबाब घेतला. मला आता मुळ फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **<u>नि.क्र.१०२</u>** देण्यात येतो. मी आरोपींना ओळखतो. एकूण

२० आरोपींपैकी ६ आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>पहिल्या सत्राची वेळ संपल्याने उलटतपासणी पुढील सत्रापर्यंत तहकूब</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

**(श्रीमती एस.एस.साळुंखे)**

दि.१५/०३/२०२३ ३रे न्यायदंडाधिकारी(प्र.श्रे.), ता.इंदापूर जि. पुणे.

**<u>सरकारी वकिल फिर्यादीस पुन्हा तपासण्याची संधी मागितली नि. १०३ वरील आदेशानुसार फिर्यादी पक्षास संधी मान्य करण्यात आली.</u>**

**<u>साक्षीदारास पुढील सरतपास शपथेवर पुन्हा सुरू:—</u>**

०४. दि.१४/११/२०१५ रोजी दवाखान्यात ॲडमिट असताना माझे पत्नीने व आईने मला सांगितले की, घटनेदिवशी सोनु भोंग याने डोक्यामध्ये तलवार मारली नसून कु—हाड उलटया बाजूने मारलेली आहे. आता मला पुरवणी जबाब दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री.डि.आर देसाई यांच्यामार्फत सुरू:—</u>**

०६. सदरची घटना ही माझे घरी भोंगवस्ती येथे घडली आहे. मला भोंगवस्ती येथील जमिनीचा गट नंबर सांगता येणार नाही. मी फिर्याद देताना पोलीसांना सदरची घटना भोंगवस्तीतील कोणत्या गट नंबरमध्ये घडली होती हे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, भोंगवस्तीमध्ये १० ते १५ घरे आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, माझे घराजवळ इतरांची घरे नाहीत. मी राहतो त्या घराच्या आजूबाजूला किती अंतरावरती वस्त्या आहेत हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, भोंगवस्तीमध्ये इतर घरे आहेत.

०७. मी फिर्याद देताना आरोपी रोहिदास भोंगळे, विनोद भोंगळे, राघू भोंगळे, आत्माराम भोंग, अमोल भोंग, रमेश भोंग, बाळू भोंग, सोनू भोंग हे ज्या वाहनातून माझे घरी आले होते त्याचा नंबर मी पोलीसांना सांगितला नव्हता. मी फिर्याद देताना कोणत्या वाहनातून कोण आले होते हे पोलीसांना सांगितले होते. परंतू सदरची बाब

पोलीसांनी माझे फिर्यादमध्ये का नमूद केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी फिर्याद देताना कोणाच्या हातात काठया होत्या, कोणाच्या हातात कु—हाड होती, कोणाच्या हातात चटणी होती हे सांगितले होते. सदरची बाब माझे फिर्यादीमध्ये नमूद का केली नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी आरोपींनी घटनेच्यावेळी काय शिव्या दिल्या हे फिर्याद देताना पोलीसांना सांगितले नव्हते.

०८. माझे फिर्यादमधील नमुद मजकूर ''सोनू भोंग याने मला तलवारीने डोक्यात मारले'' हा मजकूर खरा आहे. माझे सरतपासातील मजकूर की ''सोनू भोंग याने माझे डोक्यात कु—हाडीने मारले'' हा मजकूर खरा आहे. सोने भोंग याने माझे डोक्यात कु—हाडीने मारले होते ही बाब पोलीसांना फिर्याद देताना सांगितली होती. मी सरतपासामध्ये सोनू भोंग याने माझे डोक्यामध्ये तलवारीने मारले ही बाब सांगितली नाही. फिर्याद दिल्यानंतर १४ तारखेला पोलसांनी माझा जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, १४ तारखेचा पोलीसांना जबाब देण्यापूर्वी मी माझी आई, माझे पत्नी यांच्यासोबत चर्चा केली नव्हती. साक्षीदार पुढे स्वतःहून सांगतो की, माझी माझे पत्नी व आईसोबत घटनेबाबत चर्चा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पुरवणी जबाबातील मजकूर म्हणजेच '' सोनू भोंग याने मला तलावारीने मारले नसून त्याच्या हातामध्ये कु—हाड होती'' ही बाब मला आई व पत्नीकडून समजली हा मजकूर बरोबर आहे. माझे म्हणण्याप्रमाणे सोनू भोंग याने मला मारले त्यावेळी माझे अंगावर रक्त पडले नव्हते. सोनू भोंग याने मला कु—हाडीच्या पात्याने मारले नसून कु—हाडीच्या उलट बाजूने मारले होते. मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी सोनू भोंग याने कु—हाडीच्या पात्याने मारले नसून त्याच्या उलट बाजूने मारले ही बाब सांगितली होती.

प्रश्नः— सोनू भोंग याने कु—हाडीच्या उलटबाजूने मारले ही हकीकत फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण सांगता येईल का?

उत्तरः— सदरची बाब पुरवणी जबाबामध्ये नमूद आहे.

०९. मी पोलीसांना फिर्याद देताना राघू याने मारल्यामुळे माझा डावा हात फ्रॅक्चर झाला ही बाब सांगितली होती. ती बाब माझे फिर्यादमध्ये नमूद आहे. (आरोपीच्या वकिलांनी फिर्यादीस फिर्याद वाचण्यास दिली असता त्यामध्ये राघू याने मारल्यामुळे माझा डावा हात फ्रॅक्चर झाला ही बाब नमूद नसल्याचे फिर्यादीने मान्य केले)

आरोपी रमेश काशिनाथ भोंग हा मयत आहे किंवा नाही याबाबत माहिती नाही. मी फिर्याद देताना सचिन याने माझे, माझे आईच्या , माझे पत्नीच्या व माझे भावाच्या डोळयात मिरची पूड (चटणी) टाकली ही बाब मी पोलीसांना सांगितली होती. सदरची बाब माझे फिर्यादमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना कोणत्या आरोपीने हातावर, पाठीवर, मानेवर मारले होते हे स्पष्टपणे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना वर नमूद बाब सांगितली नाही कारण अशी कोणतीही घटना घडलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला सरतपासामध्ये नमूद मुद्देमाल आर्टिकल्स दाखविण्यात आले ते बाजारामध्ये सहज मिळू शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी म्हणतो त्या प्रमाणे आरोपींनी मला, माझे पत्नीस, आईस व भावास कोणत्याही हत्याराने मारहाण केली नाही. मी दि. १२/११/२०१५ व दि.१४/११/२०१५ रोजी दिलेली फिर्याद व पुरवणी जबाब दोन्हीही बरोबर आहेत. माझे फिर्यादमधील नमूद केलेला मजकूर की सोनू याने मला तलवारीने मारले ती तलवार आजरोजी दाखविण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये नव्हती. मी सरतपासामध्ये सांगितलेला मजकूर म्हणजे ''आमच्यातील सदरचे भांडण सोडविण्यासाठी सुदाम तुळशीराम खामगर, सागर सुनिल गिरमे, अनिल नामदेव खामगर हे आले असता आरोपींनी त्यांना बाजूला जाण्यास सांगितले.'' हा मजकूर माझे फिर्यादमध्ये नमूद नाही. मला सागर व अनिल यांनी पिकअप मधून दवाखान्यात आणले होते. सागर व अनिल यांनी मला, माझे भावाला व आईला पिक अप मधून दवाखान्यात आणले होते ही बाब मी फिर्याद देताना सांगितली नव्हती. मला दवाखान्यात आणले तो पिकअप बापूराव काशिनाथ नरूटे यांच्या मालकीचा होता परंतू मला त्याचा नंबर सांगता येणार नाही. मला सरकारी दवाखान्यातून मगर हॉस्पीटलमध्ये जाण्यास कोणी सांगितले हे मला माहित नाही. माझेकडे मोटारसायकल आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटारसायकलवरून इंदापूरकडे येताना पडलो व त्यामुळे माझे हाताला व पायाला फ्रॅक्चर झाले.

१०. मी शांताबाई हिरालाल भोंग हिला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी शांताबाई, हिरालाल, पिंटू, पुष्पा, रूक्मीनी, रमेश, अमोल व मंगल भोंग यांना दि.११/११/२०१५ रोजी बेदम मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, यातील नमूद आरोपींनी माझेविरोधात खटला दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझे घरच्यांच्या विरोधात या न्यायालयात केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आर्थिक, मानसिक त्रास व्हावा व त्यांनी दाखल

केलेल्या केसला शह देण्यासाठी मी ही आरोपींविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये मी सर्व खोटा मजकूर नमूद केला आहे.

**उलटतपास संपला.**

फेरतपासः— काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

(**श्रीमती एस.एस.साळुंखे**)

दि.१५/०३/२०२३

३रे न्यायदंडाधिकारी(प्र.श्रे.), ता.इंदापूर जि. पुणे.

| प्रमाणपत्र | | |
|---|---|---|
| **मी याद्वारे असे प्रमाणीत करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दानुसार समान आहे.** | | |
| न्यायालयाचे नाव | :: | श्रीमती. एस.एस.साळुंखे,<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर |
| लघुलेखकाचे नाव | :: | एम.पी.अंबुरे,<br>लघुलखेक निम्नश्रेणी—३ |
| आदेशाची तारीख | :: | १५/०३/२०२३ |
| न्यायालयाने सही केल्याची तारीख | :: | १५/०३/२०२३ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | १५/०३/२०२३ |